www.research-Chronicler.com

e-ISSN - 2347-503X
p-ISSN - 2347-5021



# Research Chronicler

## International Multidisciplinary Research Journal

Vol. VI Spl. Issue IV November 2018

: Executive Editor :
Dr. Manjushri Bobade

: Editor-In-Chief :
Dr. Sanjay Nagarkar

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | प्रा. डॉ. निशा भंडारे | कर्मवीर भाऊराव पाटील: प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व | 95 |
| 23 | प्रा. प्रेमचंद गायकवाड | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि आधुनिक शिक्षणातील बदल | 99 |
| 24 | प्रा. डॉ. चौधरी एन. डी. | मानवतावादी विचारांचा पुजारी: कर्मवीर भाऊराव पाटील | 103 |
| 25 | डॉ. पौर्णिमा शिरीष कोल्हे | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 105 |
| 26 | प्रा. डॉ. कल्पना एन. गावडे | महाराष्ट्राच्या सामाजिक व मानसिक जडण घडणीत रयत शिक्षण संस्थेचे योगदान | 109 |
| 27 | प्रा. डॉ. राजाराम सोनटक्के | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार व शिक्षण क्षेत्रातील योगदान | 112 |
| 28 | गायकवाड वृषाली विजय | ज्ञानरचनावाद व संस्थेची माध्यमिक शिक्षणप्रणाली | 115 |
| 29 | डॉ. एस. डी. लांडे | बदलती शैक्षणिक धोरणे व रयत शिक्षण संस्थेचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | 117 |
| 30 | प्रा. एकनाथ शिवाजी झावरे | रयत शिक्षण संस्था: स्वरूप व वाटचाल | 120 |
| 31 | प्रा. डॉ. रमेश खिळदकर | बहुजनांचे आधारवड: डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील | 124 |
| 32 | कोतकर सचिन माधवराव | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील: नेशन बिल्डर | 126 |
| 33 | प्रा. डॉ. गोविंद काळे | डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आणि सत्यशोधक समाज | 128 |




Scanned by CamScanner

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील : नेशन बिल्डर

नेतकर सचिन माधवराव

*संशोधक विद्यार्थी*

*अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर*

प्रा. डॉ. संजय पांडुरंग नगरकर

*सहयोगी प्राध्यापक*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे*

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सर्वसामान्य बहुजन समाजासाठी सर्वव्यापी शिक्षणचळवळ उभी करुन बहुजनांच्या उध्दारासाठी केलेले कार्य निश्चितच भूषणावाह असेच आहे. आधुनिक महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या शिक्षणक्षेत्रात क्रांतिकराक कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केले. ४ ऑक्टोबर १९१९ साली कर्मवीरांनी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर होत असताना त्यापासून प्रेरित होऊन इतर अनेक शिक्षण संस्था शिक्षणदानाचे कार्य आहोरात्र महाराष्ट्रात करीत आहेत. कर्मवीरांनी शिक्षणासंदर्भात शंभर वर्षापूर्वी जे विचार मांडले नव्हे तर कृतीत आणले. ते आज निश्चितच स्पृहनीय असेच आहेत.

महाराष्ट्राच्या इतिहासात फक्त दोनच महान व्यक्ती होऊन गेल्या की, ज्यांनी 'रयत' या शब्दाला एक मूल्य प्राप्त करून दिले.एक म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज की, जे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे ठरले.आणि दुसरे म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील की, ज्यांनी रयतेसाठी शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहोचवली.छत्रपती शिवराय हे अण्णांचे स्फूर्तीस्थान होते. छत्रपतींच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी रयतेसाठी कार्य केले.कर्मवीरांनी ग्रामीण भागात शिक्षणाची जी व्यापक चळवळ उभी केली त्याचे फलित म्हणजे आज महाराष्ट्र शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर झालेला दिसतो.

## सामाजिक परिवर्तन :–

कोणत्याही राष्ट्राचा विकास होण्यासाठी समाजातील सर्वच स्तरांचा विकास होणे गरजेचे असते. तरच ते राष्ट्र समर्थपणे उभे राहू शकते. त्याकरिता समाजाचे संवर्धन होणे गरजेचे असते. कर्मवीरांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे संवर्धन केलेले दिसते.समाजाप्रती असणारी तळमळ कर्मवीरांच्या कार्यातून आपल्याला पदोपदी जाणवते. शिक्षण हे फक्त उदरनिर्वाहाचे साधन नाही.तर शिक्षणातून सामाजिक आत्मियता निर्माण होत असते. शिक्षणाचा मुळी उद्देशच व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्यासाठी शिक्षणरूपी संस्कार समाजावर होणे गरजेचे असते.कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून हेच नैतिक संस्कार विद्यार्थ्यांवर केले. रयतच्या शाळा म्हणजे समाजासाठी कृतिशील कार्यकर्ते तयार करणाऱ्या पाठशाळाच ठरतात. कर्मवीरांचे शैक्षणिक कार्य आणि त्यांचे सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य आजच्या तरूणाईसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. आजवर सामाजिक परिवर्तन करणारे लाखो कार्यकर्ते रयतमधून घडलेले आहेत.

## श्रमाधिष्ठित शिक्षण :–

शिक्षणक्षेत्रात पूर्वी मूठभर लोकांचीच मक्तेदारी होती. बहुजन समाज विशेषतः ग्रामीण समाज शिक्षणाच्या प्रवाहापासून कोसो दूर होता. अशा वंचित समाजाला शिक्षित करण्याचे काम कर्मवीरांनी रयतच्या माध्यमातून केले.कर्मवीरांनी शिक्षणपध्दतीत निरनिराळे प्रयोग केल्याचे दिसते. त्यांचा श्रमातून शिक्षण घेण्याचा प्रयोग आजमितीला देखील उपकारक असाच आहे. शिक्षण घेण्यासाठी शासनाकडून अनेक सवलती मिळतात.अशा सवलतीतून मिळालेल्या शिक्षणातून विद्यार्थी पंगू बनतो. परावलंबी बनतो. आणि हेच कर्मवीरांना नको होते. म्हणूनच त्यांनी श्रमातून शिक्षण घेण्यास प्राधान्य दिलेले दिसते. शिक्षण घेत असताना स्वकष्टातून मिळालेल्या पैशामधूनच विद्यार्थ्यांच्या अंगी स्वाभिमान टिकून राहतो. श्रमातून शिक्षण घेतल्याने तो विद्यार्थी शिक्षणाचे महत्त्व तर जाणतोच पण त्यासोबतच त्याचे व्यक्तिमत्त्व देखील कणखर स्वरूपाचे बनते.शिक्षण घेत असताना जगण्याचे कौशल्य, संकटांना सामोरे जाण्याचे कौशल्य श्रम शिक्षणातूनच प्राप्त होते.



Scanned by CamScanner